॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

▪ अहिल्यानगर ▪ बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ ▪ वर्ष ७ वे ▪ अंक ७२ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


*** सुविचार ***

विचार सकारात्मक असतील तर परिणामही सकारात्मकच असतो.

## दरवाढ रोखण्यासाठी साखर साठेबाजीवर निर्बंध

### ४ हजार क्विंटलपेक्षा अधिक साठा नको, ३० दिवसांची मुदत

**● मुंबई । वीरभूमी –**

महिनाभरातच साखरेच्या भावात तब्बल ३० रुपयांपेक्षा अधिक दरवाढ झाल्याने साखरेचे दर ७० रुपयांच्या पुढे गेले आहेत. त्याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणात साखर आयात करण्याचा निर्णय घेतला आहे तर, व्यापा-यांकडून साठेबाजीला आळा घालण्यासाठी काही कठोर पावले उचलण्यात येत आहेत. अन्न व पुरवठा विभागाने आदेश जारी करत कोणताही विक्रेता ३० दिवसांपेक्षा अधिक काळ साखरेचा साठा करू शकणार नाही. तसेच एकाच ठिकाणी ४ हजार क्विंटलपेक्षा अधिक साखरेचा साठा करण्यास मनाई करण्यात आली आहे.

साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला असून, ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत हा निर्णय राज्यात लागू राहणार आहे.



केंद्र शासनाने अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या कलम ३ तसेच साखर (नियंत्रण) आदेश २०२५ मधील खंड ७ व खंड १६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून साखरेच्या साठा मर्यादेबाबत २८ जुलै २०२६ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. सदर साखर साठ्यावरील निर्बंधाचा आदेश ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत लागू राहील, असे नमूद केले आहे.

आता कोणताही साखर विक्रेता साखरेचा साठा प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत धारण करू शकणार नाही. तसेच कोणत्याही वेळी व कोणत्याही ठिकाणी ४ हजार क्विंटलपेक्षा अधिक साखरेचा साठा ठेवता येणार नाही. सदर निर्बंध शासनाच्या खात्यावरील साठ्यास तसेच राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या विक्रेत्यांमार्फत सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत रास्त भाव दुकानांमध्ये वितरणासाठी ठेवण्यात आलेल्या साठ्यास लागू राहणार नाहीत. तसेच, सर्व साखर विक्रेत्यांनी अन्न व सार्वजनिक वितरण विभागाच्या पोर्टलवर साखरेच्या साठ्याची माहिती घोषित करून ती नियमितपणे अद्ययावत ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

अन्न व पुरवठा विभागाकडून सदर अधिसूचना १ ऑगस्ट २०२६ पासून लागू होऊन ३० नोव्हेंबर पर्यंत अंमलात राहणार आहे. सदर आदेशाची सक्त अंमलबजावणी करण्यात यावी आणि साठेबाजी करणाऱ्या व्यापाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी, असे निर्देशही पुरवठा विभागाने दिले आहेत.

### रेशन दुकानांना वगळले

▪ एकीकडे साठेबाजीवर निर्बंध घालण्यात आले असले तरी परवानाधारक रेशन दुकाने या नियमातून वगळण्यात आली आहेत. त्यांना हा निर्बंध लागू नसणार आहे. वाढत्या साखरेच्या दरांमुळे सामान्य ग्राहकांना दिलासा देण्यासाठी आणि बाजारात साखरेची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले आहे.

## वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### कर्माची दोरी

सांगा कुणी कुणाचे
पहावे नेमके हित?
भावनांपेक्षा वरचढ
नेहमी ठरते गणित

प्रयत्न आपल्या हाती
बाकी कर्माची दोरी
कधी चढ, कधी उतार
प्रत्येकाची येते बारी !

## SPOT NEWS

### शाळांसाठी 'एफडीए'कडून विशेष कार्यशाळेचे आयोजन

**● मुंबई –** अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वात एफडीएच्या कारवाईचा राज्यभर धडाका सुरू आहे. मात्र, त्याचसोबत त्यांच्याकडून जनजागृती आणि संबंधितांना मार्गदर्शनही तितकेच केले जात आहे. शाळकरी मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने नियमावली जाहीर केल्यानंतर मुलांच्या आरोग्याची हेळसांड होऊ नये, आणि शिक्षक तसेच शाळा प्रशासनांना नव्या नियमावलीची योग्य माहिती व्हावी याकरता एफडीएच्या वतीने राज्यस्तरीय कार्यशाळांची एक व्यापक मोहीम राबवण्यात आली, ज्याला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. २८ जुलै ते २१ ऑगस्ट दरम्यान राज्यभरातील शाळांना त्यांच्याकरता आखून दिलेल्या नियमावलीची माहिती व्हावी याकरता राज्यभरात ९८ कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात २२ हजार ४४३ शाळांनी सहभाग घेतला होता, ज्यात २५ हजार १०८ शिक्षक सहभागी झाले होते.

### परप्रांतीय रिक्षावाला परतीच्या वाटेवर

**● मुंबई –** परिवहन मंत्र्यांनी राज्यातील रिक्षाचालकांना मराठीत संवाद साधनं बंधनकारक केलं आहे. याला काही परप्रांतीयांनी विरोध दर्शवला आहे. त्यातून एकाने परत आपल्या मूळ राज्यात परत जाण्याचा निर्णय घेताना सोबत ट्रेनमधून रिक्षा घेऊन जात असतानाचा एक व्हीडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.

## सरकारचा मोठा निर्णय! लाडकी बहिण योजनेच्या अपात्र महिलांची पुन्हा होणार पडताळणी

**● मुंबई । वीरभूमी –**

राज्यातील 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'च्या लाभार्थी महिलांसंदर्भात महत्त्वाची माहिती समोर आली आहे. योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या महिलांची पुन्हा एकदा पडताळणी करण्याच्या हालचाली सुरू झाल्याची माहिती आहे. यामुळे योजनेच्या लाभार्थी महिलांमध्ये चर्चेला उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, योजनेतील तब्बल ९१ लाख लाभार्थी महिलांना विविध कारणांमुळे अपात्र ठरवल्यानंतर सरकारकडून लाभार्थींची माहिती पुन्हा तपासण्याचे निर्देश देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे अनुसूचित जाती आणि नवबौद्ध प्रवर्गातील महिलांच्या पात्रतेचीही पडताळणी करण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती आहे.




या संदर्भात महिला आणि बाल विकास विभागाला आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळे लाभार्थी महिलांची कागदपत्रे, पात्रतेचे निकष आणि योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या अटींची पुन्हा तपासणी होण्याची शक्यता आहे. मात्र, या प्रक्रियेबाबत सरकारकडून अधिकृत घोषणा किंवा सविस्तर माहिती समोर येणे अद्याप बाकी आहे.

दरम्यान, राज्यातील कोट्यवधी महिलांच्या खात्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या जुलै महिन्याच्या १,५०० रुपयांच्या हप्त्याच्या वितरणाला मंगळवारपासून सुरुवात झाली आहे. पात्र महिलांच्या बँक खात्यांमध्ये हा निधी थेट लाभ हस्तांतरण अर्थात ऊइळ च्या माध्यमातून जमा केला जात आहे. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारकडून लाडक्या बहिणींना ही विशेष भेट देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे अनेक महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, एकीकडे हप्ता जमा होण्यास सुरुवात झाली असताना दुसरीकडे लाभार्थींची पुन्हा पडताळणी होणार असल्याची माहिती समोर आल्याने महिलांमध्ये उत्सुकता आणि काही प्रमाणात चिंता निर्माण झाली आहे.

## औषध निरीक्षक भरती प्रक्रिया रद्द

### परीक्षेत गैरप्रकार, एमपीएससीने घेतला मोठा निर्णय

**● मुंबई । वीरभूमी –**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक, गट-ब या पदासाठीची संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द केली. या परीक्षेची प्रश्नपत्रिका आधीच सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर लीक झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर मुंबई पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने केलेल्या प्राथमिक चौकशीच्या आधारे आयोगाने आज हा निर्णय घेतला. झालेली परीक्षाच रद्द झाल्याने यासाठी पुन्हा फेरपरीक्षा घेतली जाऊ शकते.

परीक्षेत गैरप्रकार झाल्याचे निष्पन्न झाल्याने आणि एकाच उमेदवाराला या परीक्षेचा प्रश्न संच मिळाला आणि त्याचा लाभ घेतल्याचे उघड झाले. या मुद्यावरून विद्यार्थ्यांनी लढा दिला. त्याला मोठे यश मिळाले. या प्रकरणी सर्वप्रथम आमदार रोहित पवार यांनी पेपरफुटीचा आरोप केला होता. महाराष्ट्र लोकसेवा आयोग अन्न व औषध प्रशासन-औषध निरीक्षक, गट ब भरती प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने फेरपरीक्षा आयोजित करणार आहे.

आयोगामार्फत औषध निरीक्षक, गट-ब, अन्न व औषध प्रशासन या संवर्गासाठी २९ जुलै २०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. २२ मार्च २०२६ रोजीच्या चाळणी परीक्षेत गैरप्रकार झाल्याबाबत आयोगास दिनांक २२ ते २६ जुलै, २०२६ या कालावधीत ई-मेलद्वारे काही उमेदवारांमार्फत तसेच लोकप्रतिनिधींकडून तक्रारी प्राप्त झाल्या. परीक्षा सुरू होण्यापूर्वी म्हणजेच दि. २० मार्च २०२६ रोजी काही उमेदवारांना प्रश्नपत्रिका/प्रश्न मिळाले होते आणि ही प्रश्नपत्रिका सोशल मीडिया/इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसृत करण्यात आली होती, असे सदर तक्रारींमध्ये नमूद करण्यात आले होते. यासंबंधीच्या निष्कर्षाआधारे आयोगाने औषध निरीक्षक, गट-ब या पदासाठीची भरती प्रक्रिया रद्द केली. चौकशी अहवालात एकाच उमेदवारास प्रश्नसंच मिळाल्याचे आणि त्याचा लाभ झाल्याचे चौकशीत दिसून येत आहे, असा प्रथमदर्शनी निष्कर्ष नोंदविला. ही परीक्षा २२ मार्च २०२६ रोजी चाळणी परीक्षा ऑफलाईन पद्धतीने ६ विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी घेतली होती.

## ४३ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**● मुंबई । वीरभूमी –**

पोलिस आस्थापना मंडळ क्रमांक १ च्या शिफारशीनुसार राज्यातील ४३ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदली आणि पदस्थापनेचे आदेश जारी करण्यात आले. प्रशासकीय कारणास्तव या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून, मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, बीड, गडचिरोली, रायगड, नाशिक, अमरावती यांसह विविध ठिकाणच्या अधिकाऱ्यांचा यात समावेश आहे.

यात काही अधिकाऱ्यांना पदोन्नतीनंतर नवीन जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत तर काही अधिकाऱ्यांची प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आली. स्वप्नील राजाराम राठोड यांची ठाणे शहरातील सहायक पोलिस आयुक्त पदावरून गंगाखेड उपविभागीय पोलिस अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली तर राजेंद्र श्रीरंग शिरतोडे यांची गंगाखेड येथून ठाणे शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून बदली करण्यात आली. शिवाजी मारुती गायकवाड यांची गडचिरोली येथील पोलिस उपअधीक्षक पदावरून नागपूर शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. महेश कृष्णराव चव्हाण यांची भामरागड येथून नागपूर शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून बदली झाली.

शुभदा शैलेश सांख्ये यांची नागपूर येथील अंमली पदार्थ टास्क फोर्समधून पुणे शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. सविता नरेंद्र शितोळे यांची नागपूर गुन्हे अन्वेषण विभागातून पुणे शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून बदली करण्यात आली. आसिफ अब्दुल अजीज शेख, विलास रामदास भोसले, चेतन बाळूभाई राठोड आणि सिमा विनायक मेर यांची अनुक्रमे गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर आणि बीड येथून मुंबई शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. राजीव धुराजी निले यांची सातारा येथील उपविभागीय पोलिस अधिकारी पदावरून बीड येथे पोलिस उपअधीक्षक, मुख्यालय म्हणून बदली करण्यात आली. राजू संभाजी सोनावणे यांची महाराष्ट्र सायबरमधून श्रीवर्धन, रायगड येथे उपविभागीय पोलिस अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे.

## गुटख्याच्या अवैध वाहतुकीवर खर्डा पोलिसांची मोठी कारवाई

### ५१.४१ लाखांचा मुद्देमाल जप्त; पाठलाग करून आयशर टेम्पो पकडला

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनावर खर्डा पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ५१ लाख ४१ हजार ४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये ४१ लाख ४१ हजार ४८ रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधी सुपारी तसेच १० लाख रुपये किमतीच्या आयशर टेम्पोचा समावेश आहे.

सोमवारी (दि. २४ ऑगस्ट) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास खर्डा पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांना गुप्त बातमीदारामार्फत धाराशिवकडून बीडकडे शिर्डी-हैदराबाद राज्य महामार्गावरून आयशर टेम्पोमधून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थाची वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली.

माहिती मिळताच पोलिसांनी जातेगाव फाटा, खर्डा येथे नाकाबंदी केली. यावेळी संशयित आयशर टेम्पो भरधाव वेगाने येताना दिसला. पोलिसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला; मात्र चालकाने वाहन न थांबवता बीडच्या दिशेने वेगाने पळ काढला. त्यानंतर




पोलिसांनी तत्काळ वाहनाचा पाठलाग सुरू केला. तेलंगशी गावच्या शिवारात पोलिसांनी अखेर संशयित टेम्पो ताब्यात घेतला.

वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा, तंबाखूजन्य पदार्थ व सुगंधी सुपारी आढळून आली. पोलिसांनी ४१ लाख ४१ हजार ४८ रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधी सुपारी आणि १० लाख रुपये किमतीचा आयशर टेम्पो असा एकूण ५१ लाख ४१ हजार ४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी राजु मेहबुब शेख (रा. भेंडटाकळी, ता. गेवराई, जि. बीड), प्रदीप विष्णू गायकवाड (रा. चऱ्हाटा फाटा, ता. जि. बीड) आणि तुषार नामदेव कुसळकर (रा. बीड) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमांसह अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक अशोक खेडकर करीत आहेत.

# लाडजळगाव येथील कालिकामाता मंदिरात आढळला १३ व्या शतकातील शिलालेख

## इ.स. १२४७ मध्ये हिरुबाई यांनी केशवनाथाचे 'कीर्तन' केल्याची नोंद

## यादवकालीन मराठी, धार्मिक परंपरा आणि स्त्रीच्या सहभागाचा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक पुरावा

■ विजय उंडे

● **अहिल्यानगर । वीरभूमी –** शेवगाव तालुक्यातील मौजे लाड जळगाव येथे १३ व्या शतकातील एक महत्त्वपूर्ण मराठी शिलालेख आढळून आला आहे. गावाच्या मध्यवस्तीत असलेल्या कालिका माता मंदिराच्या मुख्य गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या वर हा शिलालेख कोरलेला आहे. पाच ओळींच्या देवनागरी लिपीतील या शिलालेखात शालिवाहन शक ११६९, प्लवंग संवत्सर, म्हणजेच इ.स. १२४७ चा कालोल्लेख असून धनू नाईक यांच्या पत्नी हिरुबाई यांनी केशवनाथाशी संबंधित धार्मिक कार्य केल्याची नोंद आहे.

वातावरणाचा परिणाम, झीज आणि मंदिराला करण्यात आलेल्या रंगरंगोटीमुळे शिलालेखातील अक्षरे काही प्रमाणात पुसट व अस्पष्ट झाली आहेत. मात्र, शिलालेखाचा खडूचा छाप घेतल्यानंतर अथक परिश्रमातून त्यातील मजकूर वाचणे शक्य झाले आहे.

शिलालेखाचे वाचन

१. स्वस्ति स्री सकु ११६९
२. प्लवंग संवसरा
३. धनु नाऐकें हिरुबबाइययें–
४. केसवनाथाचें किर्त–
५. न केलें



शिलालेखाचा आशय असा की, शालिवाहन शक ११६९, प्लवंग नाम संवत्सर, म्हणजेच इ.स. १२४७ मध्ये धनू नाईक यांच्या पत्नी हिरुबाई यांनी केशवनाथाचे 'कीर्तन' केले. येथे 'कीर्तन केले' हा उल्लेख केवळ आजच्या अर्थाने धार्मिक गायनापुरता मर्यादित नसून, देवालयाशी संबंधित धार्मिक कार्य, स्थापना अथवा सेवा यांचा संदर्भ असण्याची शक्यता संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

### यादवकालीन इतिहासाचा महत्त्वपूर्ण पुरावा

इ.स. १२४७ च्या सुमारास महाराष्ट्रात देवगिरीच्या यादवांची सत्ता होती. त्यामुळे हा शिलालेख यादवकालीन महाराष्ट्रातील धार्मिक, सामाजिक आणि भाषिक परिस्थितीचा स्थानिक पातळीवरील महत्त्वपूर्ण पुरावा ठरतो. लेखात उल्लेखिलेल्या 'केशवनाथ' या देवतेमुळे त्या काळातील धार्मिक परंपरा आणि देवालयसंस्कृतीवरही प्रकाश पडतो.

या शिलालेखाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे हिरुबाई यांचा स्वतंत्रपणे झालेला उल्लेख. त्या धनू नाईक यांच्या पत्नी असल्याचे लेखातून स्पष्ट होते. मध्ययुगीन शिलालेखात एका स्त्रीच्या धार्मिक कार्याची नोंद आढळणे विशेष महत्त्वाचे असून, तत्कालीन समाजातील महिलांचा धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांमधील सहभाग अभ्यासण्यासाठी हा उल्लेख उपयुक्त ठरतो.

तसेच 'धनू नाईक' या व्यक्तीच्या उल्लेखामुळे तत्कालीन स्थानिक समाजरचना आणि 'नाईक' या पदनामाच्या वापराचा अभ्यास करण्यासाठीही या लेखातून महत्त्वाची माहिती मिळते.

### मध्ययुगीन मराठीचा दुर्मीळ भाषिक नमुना

शिलालेखातील 'केशवनाथाचें', 'हिरुबाईयें', 'केलें' यांसारखी भाषिक रूपे मध्ययुगीन मराठीच्या अभ्यासासाठी विशेष महत्त्वाची आहेत. या शब्दरूपांमधून तत्कालीन मराठीतील व्याकरण, विभक्तीप्रयोग, शब्दरचना आणि क्रियापदांची रूपे यांचा अभ्यास करता येतो.

इ.स. १२४७ चा हा लेख मराठी भाषेच्या प्राचीन लेखी परंपरेच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. त्यामुळे हा शिलालेख केवळ धार्मिक नोंद न राहता महाराष्ट्राच्या भाषिक इतिहासाचा प्राथमिक स्रोत ठरतो.

या शिलालेखाचा शोध व संशोधन अमोल बनकर यांनी केले असून शिलालेखाचे वाचन अथर्व पिंगळे, डॉ. शैलेंद्र भांडारे, अमोल बनकर आणि अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे. संशोधन कार्यात हनुमंत कळसाईत आणि शिवाजी झांबरे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# SPOT NEWS

## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त पंतप्रधानांचा विद्यार्थ्यांशी आभासी संवाद

● **अहिल्यानगर । वीरभूमी –** 'माय भारत' आणि राष्ट्रीय सेवा योजना (छडड) यांच्या संयुक्त विद्यमाने २९ ऑगस्ट रोजी साजरा होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त २७ ऑगस्ट रोजी पंतप्रधानांचा विद्यार्थ्यांशी आभासी संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहिल्यानगर (स्वायत्त) आणि संगमनेर नगरपालिका कला, दा. ज. मालपाणी वाणिज्य आणि ब. ना. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर (स्वायत्त) या दोन निवडक महाविद्यालयांमध्ये हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात संबंधित महाविद्यालयांतील विद्यार्थी, एनएसएस स्वयंसेवक आणि तरुणांसह राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू सहभागी होणार आहेत. पंतप्रधानांशी आभासी संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार असून, खेळ, शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, आरोग्यदायी जीवनशैली आणि सक्रिय सहभागाचे महत्त्व याबाबत तरुणांना मार्गदर्शन मिळणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंच्या सहभागामुळे विद्यार्थ्यांना यशस्वी खेळाडूंच्या अनुभवातून प्रेरणा घेता येणार आहे. क्रीडा क्षेत्रातील समर्पण, शिस्त, चिकाटी, तंदुरुस्ती आणि उत्कृष्टतेचे महत्त्वही त्यांना समजून घेता येणार आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने माय भारत आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या स्वयंसेवकांना तरुणांमध्ये खेळ, तंदुरुस्ती आणि सक्रिय जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी नाविन्यपूर्ण कल्पना मांडण्याचे आवाहन करण्यात येणार आहे. यामध्ये नाविन्यपूर्ण क्रीडा उपक्रम, सामुदायिक तंदुरुस्ती कार्यक्रम, जनजागृती मोहिमा, सर्वसमावेशक क्रीडा उपक्रम तसेच तरुणांच्या नेतृत्वाखाली राबविता येणारे विविध तंदुरुस्ती उपक्रम यांचा समावेश असू शकतो. प्राप्त झालेल्या सर्वोत्तम व नाविन्यपूर्ण कल्पनांची निवड करून राष्ट्रीय स्तरावर त्यांचा विचार व अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यामुळे तरुणांना केवळ राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या कार्यक्रमात सहभागी होण्याची नव्हे, तर देशातील क्रीडा व तंदुरुस्ती चळवळीला बळकटी देण्यासाठी आपल्या कल्पनांचे योगदान देण्याची संधी मिळणार आहे. भारताचे महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो.

## नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त सामान्यज्ञान परीक्षा

● **पाथर्डी । वीरभूमी –** पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा पाथर्डी शहराचे नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये सामान्यज्ञान, स्पर्धात्मक परीक्षांची जाणीव आणि शैक्षणिक दृष्टिकोन विकसित करण्याच्या उद्देशाने 'सामान्यज्ञान परीक्षा–२०२६' आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्रांगणात ही परीक्षा घेण्यात आली. विद्यार्थ्यांच्या ज्ञानकक्षा रुंदावण्याबरोबरच विविध स्पर्धात्मक परीक्षांची पूर्वतयारी व्हावी, या उद्देशाने परीक्षेचे आयोजन करण्यात आले. पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक उपक्रमांतून विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न ठेवता त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासावर भर दिला जात आहे. सामान्यज्ञान परीक्षा हा त्याच शैक्षणिक दृष्टिकोनाचा महत्त्वपूर्ण भाग असून, चालू घडामोडी, इतिहास, भूगोल, विज्ञान, भारतीय राज्यघटना, क्रीडा, साहित्य आणि विविध ज्ञानशाखांशी परिचित होण्यासाठी अशा उपक्रमांचा विद्यार्थ्यांना लाभ होतो. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. ए. चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक सलीम शेख व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने या कार्यक्रमाचे नियोजन केले. परीक्षेत एकूण ४२५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यामध्ये इयत्ता अकरावी : प्रथम – राठोड अश्विनी संजय, द्वितीय – गव्हाणे सार्थक आजिनाथ, तृतीय – शेख कौसर हमीद, उत्तेजनार्थ – घुले साक्षी आदिनाथ. इयत्ता बारावी : प्रथम – खेडकर नियती बाबासाहेब, द्वितीय – शिंदे विठ्ठल बाळू, तृतीय – दिवटे गायत्री मोहन, उत्तेजनार्थ – बडे अमोल कोंडीबा, सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांना प्राधान्य देत आयोजित करण्यात आलेल्या या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला चालना मिळण्याबरोबरच स्पर्धात्मक परीक्षांच्या दृष्टीने त्यांच्यात सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे.

## अभिनव स्कूलमध्ये विद्यार्थी-पालकांना जेईई-नीटसाठी करिअर मार्गदर्शन



● **अकोले । वीरभूमी–** मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, अकोले येथे इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसह पालकांसाठी जेईई, नीटसह विविध स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीबाबत विशेष करिअर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

ऊर्जा करिअर अकॅडमीचे संचालक तथा करिअर मार्गदर्शक प्रा. डॉ. सुशीलकुमार एन. बेनके यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांचे स्वरूप, उपलब्ध करिअरच्या संधी, योग्य करिअर निवड, पुढील शैक्षणिक वाटचाल, अभ्यासाचे नियोजन आणि वेळेचे व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले. 'ध्येय मोठे ठेवा, मेहनतीला पर्याय नाही,' असा प्रेरणादायी संदेश देत सातत्य, नियोजन आणि आत्मविश्वासाच्या बळावर स्पर्धात्मक परीक्षांना सामोरे जाण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. सुशीलकुमार बेनके यांचा शाळेच्या प्राचार्या अल्फोंसा डी. यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास ज्युनिअर कॉलेजच्या विभागप्रमुख स्मिता पुंड व पर्यवेक्षक पराग सानप उपस्थित होते.

या मार्गदर्शन सत्रामुळे विद्यार्थ्यांना जेईई, नीटसारख्या परीक्षांची तयारी, करिअरची योग्य दिशा आणि भविष्यातील शैक्षणिक संधींचे नियोजन याबाबत उपयुक्त माहिती मिळाली. कार्यशाळेला पालकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन हेमंत मंडलिक यांनी केले.

## शिवप्रहारच्या राज्य उपाध्यक्षपदी संदीप काटे

### पुण्यातील १२ व्या वर्धापन दिनाच्या कार्यकर्ता मेळाव्यात दिले नियुक्तीपत्र

● **पाथर्डी । वीरभूमी–** शिवप्रहार संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी पाथर्डी येथील सामाजिक कार्यकर्ते संदीप काटे यांची निवड करण्यात आली. पुणे येथे आयोजित संघटनेच्या १२व्या वर्धापन दिनाच्या कार्यकर्ता मेळाव्यात संस्थापक अध्यक्ष संजीव भोर यांच्या हस्ते काटे यांना नियुक्तीपत्र देऊन निवडीची घोषणा करण्यात आली.



सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या संदीप काटे यांनी गोरगरीब, वंचित व पीडित घटकांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. समाजहितासाठी त्यांनी सातत्याने केलेल्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर राज्य उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल पाथर्डी तालुक्यातील सामाजिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

शिवप्रहार संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त पुण्यात आयोजित कार्यकर्ता मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी गोरगरीब, वंचित व पीडित घटकांसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तसेच उद्योग व विविध क्षेत्रांत आदर्शवत काम करणाऱ्या समाजधुरीणांचा विविध पुरस्कारांनी गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार शंकरआण्णा धोंडगे होते. यावेळी सुप्रसिद्ध व्याख्याते गणेश शिंदे, राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य व प्राचार्य एम. एम. तांबे, मराठा महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

आदर्श सेवाव्रती दाम्पत्यासाठी देण्यात येणाऱ्या 'समर्पण' पुरस्काराने डॉ. सुचेता व डॉ. राजेंद्र धामणे यांचा शिवप्रहार संघटनेच्या वतीने गौरव करण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान झाल्याने मेळाव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

दरम्यान, संदीप काटे यांच्या निवडीबद्दल पाथर्डी परिसरातील सामाजिक, राजकीय तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. संघटनेने सोपविलेली जबाबदारी सामाजिक बांधिलकीने पार पाडून शिवप्रहारच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी कार्यरत राहणार असल्याचे काटे यांनी सांगितले.

# पाथर्डीत दुष्काळी उपाययोजनांसाठी स्वाभिमानीचा इशारा

## २० दिवसांत कार्यवाही न झाल्यास रास्तारोको । पाणी, चारा, पीक पंचनामे व पीकविम्याची मागणी

● **पाथर्डी । वीरभूमी –** तालुक्यासह भगवानगड परिसरात अपुरा व अनियमित पाऊस झाल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी, पशुधन व नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने तहसीलदार उद्धव नाईक यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. २० दिवसांत कार्यवाही न झाल्यास रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

तालुक्यातील अनेक गावांत पावसाअभावी पिके वाळण्याच्या स्थितीत आहेत. चारा व पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे तातडीने चाराडेपो सुरू करावे, जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करावी, तसेच गरजेनुसार नागरिकांसाठी टँकर सुरू करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना मिळणारे प्रोत्साहनपर अनुदान वाढवून किमान दोन लाख रुपये करावे. बाधित गावांची पाहणी करून दुष्काळी उपाययोजना लागू कराव्यात, अशीही मागणी आहे.

कोरडगाव–भगवानगड रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. रस्त्याच्या कामाची तांत्रिक चौकशी व गुणवत्ता तपासणी करून दोषी ठेकेदारावर कारवाई करावी. रस्त्याचे दर्जेदार काम करावे, अशी मागणी संघटनेने केली आहे.

गावठाणालगतच्या विहिरींचे पाणी व्यवस्थापन करून पिण्याच्या पाण्यासाठी त्यांचा वापर करावा. भूजलाचा अनावश्यक उपसा थांबवावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

नांदूर–निंबादैत्य येथील वनक्षेत्रात नियमांचे पालन करून पर्यटनस्थळ विकसित करावे. पर्यटन विकास आराखडा तयार करून स्थानिकांना रोजगाराच्या संधी द्याव्यात, अशी मागणी आहे.

भगवानगड ४६ गाव पाणीपुरवठा योजना तातडीने सुरू करून नियमित पाणीपुरवठा करावा. नांदूर–निंबादैत्य येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करावे, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

अपुऱ्या पावसामुळे पिकांचे नुकसान झाले असून कृषी व महसूल विभागाने तातडीने पंचनामे करावेत. पात्र शेतकऱ्यांना शासकीय मदत व पीकविमा लाभ द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.



निवेदनातील मागण्यांवर २० दिवसांत कार्यवाही करून लेखी माहिती द्यावी. अन्यथा शेतकरी व ग्रामस्थांच्या हक्कांसाठी शांततामय रास्तारोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला आहे. निवेदनावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विकास वाघ, अशोक दहिफळे, गणेश वाघ, दिपक फाजगे, संजय देशमुख, दगडू गणेश देशमुख, अजिनाथ काटकर वाघ, संजय गाडे, भिमराज दहिफळे, यांच्या सह्या आहेत.

SPOT NEWS

## केडगावात साई सच्चरित्र पारायणास भक्तिमय वातावरणात प्रारंभ

**अहिल्यानगर । वीरभूमी-**
केडगाव येथील बँक कॉलनी परिसरातील श्री साईबाबा मंदिराच्या तेराव्या वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांचा शुभारंभ सोमवार, दि. २५ ऑगस्ट रोजी राजू सातपुते यांच्या हस्ते श्री साई सच्चरित्र ग्रंथाचे विधिवत पूजन करून भक्तिमय वातावरणात करण्यात आला. यावेळी श्री साई सच्चरित्र ग्रंथाचे पारायण वाचन श्रीनिवास सहदेव, राहुरी यांच्या वाणीतून होणार आहे. पारायणाच्या निमित्ताने मंदिर परिसरात भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, मोठ्या संख्येने साईभक्त पारायणात सहभागी होत आहेत. श्री साईबाबा मंदिराचा वर्धापन दिन विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये काकड आरती, दुग्धाभिषेक, महापूजा यांसह विविध धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सामाजिक बांधिलकी जपत मोफत आरोग्य तपासणी शिबिर व रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. वर्धापन दिनानिमित्त मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दि. ३१ ऑगस्ट रोजी श्री साईबाबांच्या पालखी व पादुकांची भव्य मिरवणूक शाहूनगर तसेच संपूर्ण केडगाव परिसरातून काढण्यात येणार आहे. साईनामाच्या जयघोषात निघणाऱ्या या मिरवणुकीत मोठ्या संख्येने साईभक्त सहभागी होणार आहेत. तसेच १ सप्टेंबर रोजी श्री साई कथाकार सौ. माधुरीताई शिंदे (शिर्डी) यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. याच दिवशी विविध मान्यवरांच्या हस्ते मध्यान्ह आरती करण्यात येणार आहे. यावेळी महाप्रसादचे आयोजनही करण्यात आले. या सर्व धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमांचा लाभ केडगाव परिसरासह नगर शहरातील सर्व साईभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून घ्यावा, असे आवाहन श्री साईबाबा फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## हरिहरेश्वर मंदिरात 'अघोरी महाकाल'चा थाटात शृंगार

**अहिल्यानगर । वीरभूमी-**
बागरोजा हडको, दिल्ली गेट येथील श्री हरिहरेश्वर महादेव मंदिरात हरिहरेश्वर मित्र मंडळ (ट्रस्ट)च्या वतीने नित्य सोमवार महाआरतीचा ५२वा सोहळा तसेच दुसऱ्या श्रावण सोमवारनिमित्त भगवान महादेवांचा 'अघोरी महाकाल' स्वरूपातील विशेष शृंगार भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. श्रावण महिन्यात भगवान महादेवांच्या दर्शनाला विशेष महत्त्व असल्याने मंदिर परिसरात सकाळपासूनच भाविकांची मोठी वर्दळ होती. 'अघोरी महाकाल' स्वरूपातील आकर्षक शृंगार भाविकांचे विशेष आकर्षण ठरला. या शृंगाराचे दर्शन घेण्यासाठी अहिल्यानगर शहरासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने मंदिरात उपस्थिती लावली. महाआरतीच्या वेळी मंदिर परिसर 'हर हर महादेव', 'बम बम भोले'च्या जयघोषाने दुमदुमून गेला. भक्तिमय वातावरणात विधिवत महाआरती करण्यात आली. भाविकांनी महादेवाचे दर्शन घेऊन श्रद्धेने पूजा-अर्चना केली. विशेष शृंगारामुळे मंदिर परिसरात आध्यात्मिक आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. महाआरतीनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष नियोजन केले. मोठ्या संख्येने भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. हरिहरेश्वर मित्र मंडळ (ट्रस्ट)च्या कार्यकर्त्यांनी श्रावण सोमवारनिमित्त केलेल्या विशेष नियोजनाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# मढी-निवडुंगे रस्त्यासाठी आंदोलनाचा इशारा

### खड्ड्यांमुळे भाविकांसह नागरिक त्रस्त । ३१ ऑगस्टपर्यंत काम सुरू न झाल्यास तहसील कार्यालयासमोर सत्याग्रह

**पाथर्डी । वीरभूमी -**
तालुक्यातील मढी ते निवडुंगे मार्गावर मोठमोठे खड्डे पडल्याने रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी निवडुंगे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच आसाराम गंगाधर ससे यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे. रस्त्याचे काम तातडीने सुरू न झाल्यास सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी पाथर्डी तहसील कार्यालयासमोर सत्याग्रह आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.



अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री क्षेत्र कानिफनाथ महाराज मंदिराकडे जाणाऱ्या मढी-निवडुंगे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. त्यामुळे मंदिराच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसह या मार्गावरून नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेमार्फत जनसुविधा योजनेंतर्गत मढी देवस्थान ते निवडुंगे तसेच मढी ते तिसगाव रस्त्याच्या दुरुस्तीसाठी १५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. मात्र, निधी मंजूर होऊनही प्रत्यक्ष काम सुरू करण्याबाबत अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

सध्या श्रावण महिना आणि अमावस्येच्या काळात हजारो भाविक रात्री-दिवस मढी येथे दर्शनासाठी येत आहेत. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे भाविकांची मोठी गैरसोय होत असून अपघाताचा धोकाही निर्माण झाला आहे. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध असताना त्याचा योग्य वेळी वापर न झाल्यास चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणीही ससे यांनी केली आहे.

रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरू करण्यात यावे, अन्यथा सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी पाथर्डी तहसील कार्यालयासमोर सत्याग्रह आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर राहील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनाच्या प्रती गटविकास अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता, पंचायत समिती पाथर्डीचे संबंधित अधिकारी तसेच जिल्हा परिषद उपविभागातील अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे मढी-निवडुंगे रस्त्याच्या दुरुस्तीच्या प्रश्नावर प्रशासन आता कोणती भूमिका घेते, याकडे ग्रामस्थ व भाविकांचे लक्ष लागले आहे.

# अकोलेत २७ ऑगस्टला विशेष संत सत्संग सोहळा

### श्रावण मासानिमित्त BAPS स्वामीनारायण संस्थेच्या संतांचे आगमन



**अकोले । वीरभूमी-**
अकोले शहरात प्रथमच स्वामीनारायण BAPS संस्थेच्या संतांचे मंगलमय आगमन होत असून, श्रावण मासाच्या पावन पर्वानिमित्त संतांच्या सान्निध्यात विशेष संत सत्संग सोहळ्याचे आयोजन गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले आहे. सायंकाळी ६.३० ते रात्री ९ वाजेपर्यंत देवठाण रोडवरील विठ्ठल लॉन्स येथे हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती आयोजक योगी केशव बाबा चौधरी यांनी दिली.

यापूर्वी दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंत अकोले शहरातून कार्यक्रमस्थळापर्यंत संतांची सवाद्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीसह संत सत्संग सोहळ्यास परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या सत्संग सोहळ्यास पूज्य संत श्रीजीकीर्तन स्वामी (अध्यापक संत, संस्कृत साहित्याचार्य, सारंगपूर, गुजरात), पूज्य महाव्रत स्वामीजी (कोषाध्यक्ष, कोठारी संत, नाशिक), पूज्य संत अमरनिलय स्वामीजी (नाशिक) आणि पूज्य संत गौरव मुनी स्वामीजी (नाशिक) यांची उपस्थिती राहणार आहे.

संतांच्या पावन सान्निध्यात सत्संग, भक्ती, संस्कार आणि आध्यात्मिक विचारांचा मंगलमय अनुभव घेण्याची ही सुवर्णसंधी असून, परिसरातील सर्व भाविक भक्तांनी सहकुटुंब या पवित्र संत सत्संग सोहळ्यास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन स्वागताध्यक्ष आमदार डॉ. किरण लहामटे, आयोजक योगी केशव बाबा चौधरी आणि स्वामीनारायण BAPS भक्त परिवार, अकोले यांनी केले आहे.

# बनावट झोन बदलून नागरिकांची फसवणूक केल्याप्रकरणी शेवगावात चौघांवर गुन्हा दाखल

**शेवगाव । वीरभूमी-**
शेवगाव नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षरीचा वापर करून झोन दाखला तयार केल्याचा तसेच तो खरा असल्याचे भासवून नागरिकाची आर्थिक फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी नगरपरिषदेतील तीन वसुली लिपिकांसह एका खासगी व्यक्तीविरुद्ध शेवगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. या प्रकारामुळे नगरपरिषद वर्तुळात खळबळ उडाली आहे.

नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी विजया दत्तात्रय घाडगे यांनी मंगळवार (दि. २५) रोजी शेवगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्या मागील दोन वर्षांपासून शेवगाव नगरपरिषदेत मुख्याधिकारी म्हणून कार्यरत आहेत. नगरपरिषदेतील तुराबअली शौकतअली सय्यद (रा. पैठण), हबीब सुन्ना शेख (रा. नाईकवाडी मोहल्ला, शेवगाव) व ज्ञानेश्वर प्रल्हाद भारस्कर (रा. साठेनगर, पैठण रोड, शेवगाव) हे वसुली लिपिक म्हणून कार्यरत आहेत.

२३ जुलै २०२६ रोजी महेशर मन्सूर कुरेशी (रा. सम्राट अशोकनगर, शेवगाव) हे मुख्याधिकारी घाडगे यांच्याकडे आले. त्यांनी झोन दाखला दाखविला. मात्र, दाखल्यावरील स्वाक्षरी आपली नसल्याचे घाडगे यांच्या निदर्शनास आले. याबाबत कुरेशी यांच्याकडे चौकशी केली असता, घराच्या बांधकामासाठी कर्ज घेण्याच्या उद्देशाने समीर शहा यांच्यामार्फत फायनान्स कंपनीकडे कर्जप्रकरण केल्याचे त्यांनी सांगितले. कर्जप्रकरणासाठी झोन दाखला आवश्यक असल्याचे सांगण्यात आल्याने कुरेशी यांनी त्यांच्या वडिलांच्या नावावर असलेल्या गाव नकाशानुसार गट क्रमांक १६२८ व जुना सर्व्हे क्रमांक २१८ मधील जागेसाठी नगरपरिषदेकडे झोन दाखल्यासाठी अर्ज केला होता. मात्र, संबंधित जागा 'ग्रीन झोन'मध्ये असल्याने बांधकामासाठी झोन दाखला देता येत नसल्याचे लिपीकांनी सांगितले. त्यानंतर फायनान्सशी संबंधित असल्याचे सांगणाऱ्या समीर शहा यांनी नगरपरिषदेतील संबंधित कर्मचाऱ्यांच्या संगनमताने झोन दाखला काढून देण्याचे कुरेशी यांना सांगितले. त्यासाठी त्यांच्याकडून नऊ हजार रुपये घेण्यात आले. त्यानंतर नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षरीचा वापर करून झोन दाखला तयार करण्यात आला व तो खरा असल्याचे सांगून कुरेशी यांची फसवणूक करण्यात आली.

या प्रकरणात तुराबअली शौकतअली सय्यद, हबीब सुन्ना शेख व ज्ञानेश्वर प्रल्हाद भारस्कर या कर्मचाऱ्यांनी संगनमताने पैसे घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच नगरपरिषदेच्या शिक्क्याचा गैरवापर करून मुख्याधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षरीचा झोन दाखला तयार केला. तक्रारीत समीर शहा यांचाही उल्लेख करण्यात आला आहे. बनावट कागदपत्र तयार करणे, शासकीय कार्यालयाचा शिक्का व अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीचा गैरवापर करणे तसेच आर्थिक फसवणूक केल्याच्या आरोपावरून सय्यद, शेख, भारस्कर व शहा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद खांडबहाले हे करीत आहेत.

# विश्वबंधुत्वाचा संदेश देत पारनेरमध्ये रक्तदान महाअभियान

### ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या पारनेर केंद्राचा सामाजिक उपक्रम

**पारनेर । वीरभूमी-**
राजयोगिनी दादी प्रकाशमणीजी यांच्या १९व्या पुण्यतिथीनिमित्त प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पारनेर केंद्राच्या वतीने 'विश्वबंधुत्व रक्तदान महाअभियान' आयोजित करण्यात आले. केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी साधना दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमातून मानवसेवा, बंधुभाव आणि आध्यात्मिक मूल्यांचा संदेश देण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. चाटे किड्स स्कूल व जिजामाता सेमी इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष डॉ. सादिक राजे, आनंद ऋषी ब्लड बँकेचे जनसंपर्क अधिकारी सुनील महानोर, सनराइज अकॅडमीचे संचालक सुनील चौधरी, उद्योजक संभाजी मगर, देवराम भाई, प्रतिमा माताजी, मगर माताजी, राम भाई आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ब्रह्माकुमारी साधना दीदी यांनी आध्यात्मिक मार्गदर्शन करताना सांगितले की, रक्तदान म्हणजे केवळ रक्त देणे नसून दुसऱ्याच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणारी पवित्र सेवा आहे. प्रत्येक मनुष्य हा परमात्म्याची संतती असल्याने जात, धर्म, भाषा व प्रांताच्या भिंती बाजूला ठेवून मानवतेच्या कल्याणासाठी कार्य करणे हीच खरी विश्वबंधुत्वाची भावना आहे.

दादी प्रकाशमणीजी यांनी आपल्या जीवनातून प्रेम, शांती, करुणा आणि बंधुभावाचा संदेश दिला. त्यांच्या पुण्यस्मृतीनिमित्त आयोजित या रक्तदान अभियानातून त्यांच्या विचारांना कृतीची जोड मिळत आहे. मनात सकारात्मक विचार, निःस्वार्थ भावना आणि सेवाभाव निर्माण झाल्यास समाजात शांतता व सौहार्दाचे वातावरण निर्माण होऊ शकते, असा संदेशही त्यांनी दिला.

रक्तदानामुळे गरजू रुग्णांना मदत होते. त्यामुळे प्रत्येक सक्षम नागरिकाने नियमित रक्तदान करून मानवसेवेच्या या कार्यात योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

रक्तदान हे मानवतेची सेवा करण्याचे उत्तम साधन असून प्रत्येक निरोगी व्यक्तीने रक्तदानासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन डॉ. सादिक राजे यांनी केले. अपघातग्रस्त, शस्त्रक्रिया होणारे, प्रसूतीतील महिला तसेच विविध आजारांनी ग्रस्त रुग्णांना रक्ताची गरज भासत असते. विज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्राने मोठी प्रगती केली असली तरी आजही रक्ताला कृत्रिम पर्याय उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे रक्तदात्याचे योगदान अमूल्य आहे.

एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचण्यास मदत होऊ शकते. नागरिकांनी नियमित रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपावी. रक्तदानाबाबतचे गैरसमज दूर करून अधिकाधिक नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान करावे. रक्तदानातून मिळणारा आनंद आणि समाधान हे शब्दांत व्यक्त करता येत नाही, असे डॉ. राजे यांनी सांगितले.

# नगर तालुका तालीम सेवा संघाच्या अध्यक्षपदी पै. नाना डोंगरे

**अहिल्यानगर । वीरभूमी-**
नगर तालुका तालीम सेवा संघाच्या नवीन कार्यकारिणीला धर्मादाय उपायुक्तांची मान्यता मिळाली आहे. संघाच्या कार्यकारिणीची मुदत संपल्यानंतर अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी धर्मादाय उपायुक्तांकडे चेंज रिपोर्ट दाखल केला होता. या चेंज रिपोर्टला मंजुरी मिळाल्याने संघाच्या नवीन कार्यकारिणीचा मार्ग मोकळा झाला असून, पै. नाना डोंगरे यांची पुन्हा पाच वर्षांसाठी अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

नगर तालुका तालीम सेवा संघाची सन २०२४ मध्ये पाच वर्षांच्या कालावधीसाठी कार्यकारिणीची मुदत संपली होती. सदर कार्यकारिणीची मुदत पूर्ण झाल्यानंतर संघाच्या प्रशासकीय कामकाजाबाबत आवश्यक असलेला चेंज रिपोर्ट धर्मादाय उपायुक्त कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. या अहवालाची प्रक्रिया पूर्ण होऊन नवीन कार्यकारिणीला अधिकृत मान्यता मिळाली आहे. त्यामुळे संघाच्या आगामी कार्याला संस्थात्मक आणि कायदेशीर स्वरूपात महत्त्व प्राप्त झाले आहे.

नवीन कार्यकारिणीत कार्याध्यक्षपदी प्रतिभा डोंगरे, उपाध्यक्षपदी काशीनाथ पळसकर व संदिप डोंगरे, सचिवपदी बाळू भापकर, सहसचिवपदी प्रियंका डोंगरे, खजिनदारपदी किसन वाबळे, तर विश्वस्तपदी उत्तम कांडेकर यांची निवड करण्यात आली आहे. अनुभवी पदाधिकाऱ्यांसह नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून संघाचे काम अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

तालीम सेवा संघाच्या माध्यमातून तालुक्यातील कुस्ती क्षेत्राला सातत्याने प्रोत्साहन दिले जाते. संघाच्या वतीने विविध कुस्ती स्पर्धांचे आयोजन केले जाते. विविध स्पर्धांसाठी खेळाडूंची निवड चाचणी घेऊन गुणवंत मल्लांची निवड केली जाते आणि त्यांना पुढील स्तरावरील स्पर्धांसाठी संघाच्या माध्यमातून पाठविले जाते. ग्रामीण भागातील तसेच नवोदित कुस्तिपटूंना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या खेळातील कौशल्याला चालना देणे आणि त्यांना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली जात आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www.veerbhuminews.com

# सरला बेटाचा प्रमुख तीर्थस्थळ म्हणून विकास करणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस | सदगुरू योगीराज गंगागिरी महाराजांनी सुरू केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाला उपस्थिती

**● शिर्डी | वीरभूमी–**

तीर्थस्थळ म्हणून सरला बेटाच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात येत असून सर्व विकासकामे पूर्ण झाल्यावर सरला बेट महाराष्ट्रातील भाविकांसाठी आध्यात्मिक ऊर्जा केंद्र असेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सरला बेट विकासाचा आराखड्याच्या माध्यमातून सभागृह, रस्ते, पूरसंरक्षण आणि सौरऊर्जा यासह विविध कामे सुरू करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या कीर्तनानिमित्त आयोजित सोहळ्यात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार विठ्ठल लंघे, अमोल खताळ, आशुतोष काळे, विवेल कोल्हे, वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे, महंत रामगिरी महाराज, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे आदी उपस्थित होते.

सदगुरू योगीराज गंगागिरी महाराजांनी सुरू केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या परंपरेचा उल्लेख करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सरला बेटावर या ठिकाणाहून समाजाला विचार आणि प्रेरणा मिळते. हरिनाम संकीर्तनामुळे दुःखाचे हरण होते, मनातील 'मी'पणा दूर होतो आणि जातीभेद विसरून सर्वजण एकत्र येतात. प्रत्येकामध्ये विठ्ठलाचे दर्शन घेण्याची भावना निर्माण होते. आजच्या जगामध्ये हरिनाम संकीर्तन समाजाला एकत्र आणणारा आणि जीवनाला सकारात्मक दिशा देणारा मोठा उपाय आहे.

भारताची संस्कृती आणि सभ्यता जगातील सर्वात जुनी असून, हजारो वर्षांपासून या भूमीवर सनातन विचार, संस्कार आणि आध्यात्माची परंपरा अखंड सुरू आहे. अनेक आक्रमणे झाली तरी आपल्या विचारांना, संस्कारांना आणि श्रद्धेला कोणीही बदलू शकले नाही. वारकरी परंपरा, गुरु परंपरा आणि हरिनामाच्या शक्तीमुळे ही संस्कृती अखंड राहिली, असे मुख्यमंत्री म्हणाले.

हरिनाम संकीर्तनात शेतकरी बांधव सहभागी होत असल्याचा उल्लेख करतांना मुख्यमंत्री म्हणाले, शेतकरी, वारकरी, शेतमजूर आणि समाजातील वंचित घटकांच्या विकासासाठी शासन प्रयत्न करीत आहे. शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने शेतकऱ्यांना दिलेला कर्जमाफीचा शब्द पूर्ण करत साडेबारा लाख शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये आतापर्यंत कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली असून, ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा उपक्रम सुरू आहे. दर पंधरा दिवसांनी नवीन पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करून त्यांच्या खात्यात रक्कम जमा केली जात आहे.

शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, सध्या ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा आठ तास वीज मिळत आहे. टप्प्याटप्प्याने १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यात येईल. पुढील काळात वर्षभार १२ तास मोफत वीज देण्याचा निर्धाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांची ५८ हजार कोटी रुपयांची थकीत वीजबिले माफ करण्याचा निर्णयही शासनाने घेतला असल्याचेही श्री.फडणवीस म्हणाले.



**सप्ताह समाजाला एकत्र आणणारा आध्यात्मिक सोहळा : शिंदे**

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, अखंड हरिनाम सप्ताह हा अलौकिक सोहळा असून, या भूमीला योगीराज गंगागिरी महाराजांच्या तपश्चर्येचा आणि आशीर्वादाचा स्पर्श लाभला आहे. महंत रामगिरी महाराजांच्या अमृतवाणीतून भक्तीचा अखंड प्रवाह सुरू आहे. हरिनाम सप्ताह हा केवळ धार्मिक सोहळा नसून समाजाला एकत्र आणणारा, भक्ती आणि संस्कारांची ऊर्जा देणारा सोहळा आहे.

गंगागिरी महाराजांनी सुरू केलेली १७९ वर्षांची ही परंपरा आजही मोठ्या श्रद्धेने पुढे सुरू आहे. या सप्ताहामुळे संपूर्ण परिसरात भक्ती, प्रसन्नता आणि मांगल्याचे वातावरण निर्माण झाले आहे. 'गावची एकी तर देवाची कृपा नक्की' याचा प्रत्यय या सप्ताहातून येत असून, पंचक्रोशीतील नागरिकांचे ऐक्य येथे दिसून येत आहे, असे श्री. शिंदे यांनी सांगितले.

शेतकरी आणि महिलांसाठी शासनाच्या विविध योजनांचा उल्लेख करत ते म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुढेही सुरू राहील. प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेसोबत राज्य शासनाने नमो शेतकरी सन्मान योजना सुरू केली आहे. शासनाच्या तिजोरीवर पहिला अधिकार बळीराजाचा आहे, अशी शासनाची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. कर्जमाफीच्या दुसऱ्या टप्प्यात सहा लाख शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजार कोटी रुपये जमा करण्यात आल्याचेही श्री.शिंदे यांनी नमूद केले.

**अखंड हरीनाम सप्ताह समाजाला दिशा देणारा : ना. विखे पाटील**

पालकमंत्री डॉ. पाटील म्हणाले, अखंड नामसप्ताह हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून समाजाला एकत्र आणणारा, शांती देणारा आणि जीवनाला योग्य दिशा देणारा आध्यात्मिक सोहळा आहे. सात दिवसांच्या नामस्मरणातून आणि महंत रामगिरी महाराजांच्या मधुर वाणीतून परस्परांमध्ये प्रेम, बंधुभाव वाढविण्याचा तसेच व्यसनमुक्त आणि बलशाली समाज घडविण्याचा संदेश मिळतो.

महंत रामगिरी महाराज अध्यात्माचा वारसा पुढे नेत असून, त्यांच्या आध्यात्मिक चळवळीचे समाजाला दिशा देण्याच्यादृष्टीने मोठे महत्त्व आहे. अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून संतांचे विचार आणि संस्कार समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचत आहेत. या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासाठी शासन आवश्यक सहकार्य करेल, अशी ग्वाही डॉ.विखे पाटील यांनी दिली.

वंदे मातरम् गीताच्या समूह गायन बद्दल महंत रामगिरी महाराज यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सन्मान पत्र देण्यात आले. सोनियाचा दिन आज उगवला या अभंगाच्या तालावर उपस्थित मान्यवरांनी फुगडी खेळली.

# शेवगावचे नगरसेवक रिझवान शेख यांचे नगरसेवकपद रद्द

## जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश; जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याने कारवाई

**● शेवगाव | वीरभूमी–**

शेवगाव नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ३ मधून नागरिकांचा मागासवर्ग (ओबीसी) प्रवर्गातून निवडून आलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक रिझवान छोटूभाई शेख यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरविल्याने त्यांचे नगरसेवकपद रद्द करण्यात आले आहे. याबाबत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सोमवार (दि. २४) रोजी आदेश जारी केला आहे.



शेवगाव नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ३ मधील ओबीसी प्रवर्गाच्या जागेवर रिझवान छोटूभाई शेख हे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून निवडून आले होते. त्यांच्या जात प्रमाणपत्राबाबत आक्षेप घेण्यात आल्यानंतर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रकरण गेले होते. समितीने संबंधित जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्याने त्यांच्या नगरसेवकपदावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेल्या निर्णयामध्ये कायदेशीर पुराव्यांचा अभाव असल्याचे तसेच संबंधित व्यक्तीचा दावा केलेल्या जातीशी नातेसंबंध सिद्ध होत नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे रिझवान शेख यांचे ओबीसी जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदीनुसार त्यांचे नगरसेवकपद रिक्त झाल्याचे मानण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर शेवगाव नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना संबंधित प्रभाग क्रमांक ३ मधील ओबीसी जागा रिक्त झाल्याची नोंद घेऊन आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच पुढील निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाला याबाबत माहिती देण्याचे आदेशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. रिझवान छोटूभाई शेख यांच्या जात प्रमाणपत्राबाबत आणि नगरसेवकपदाबाबत आक्षेप घेत शिवसेनेचे पराभूत उमेदवार प्रताप फडके यांनी तक्रार केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या पडताळणी प्रक्रियेनंतर जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याने आता जिल्हाधिकाऱ्यांनी नगरसेवकपद रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

या आदेशामुळे शेवगाव नगरपरिषदेतील प्रभाग क्रमांक ३ मधील ओबीसी प्रवर्गाची जागा रिक्त झाली असून, या जागेवर पुढील काळात निवडणूक होण्याची शक्यता आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर नगरपरिषद प्रशासन तसेच राज्य निवडणूक आयोगाकडून पुढील कार्यवाहीकडे आता शहराचे लक्ष लागले आहे.

# राखीच्या धाग्यातून जवानांना सलाम

## 'एक राखी सैनिक के नाम' उपक्रमातून विवेकानंद विद्यामंदिरच्या विद्यार्थिनींची देशसेवेप्रती कृतज्ञता

**● पाथर्डी | वीरभूमी–**

शहरातील श्री विवेकानंद विद्यामंदिर येथे रक्षाबंधनानिमित्त 'सैनिक हो तुमच्यासाठी...' व 'एक राखी सैनिक के नाम' या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.




यावेळी अभय आव्हाड म्हणाले की, देशाच्या सीमेवर प्रतिकूल परिस्थितीत अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. विद्यार्थिनींनी विविध रंग, सजावटीचे साहित्य आणि कल्पकतेचा वापर करून तयार केलेल्या राख्यांच्या माध्यमातून जवानांच्या शौर्याला सलाम केला आहे. सैनिकांमुळेच देशातील नागरिक सुखाने आणि सुरक्षितपणे जीवन जगत आहेत. सैनिकांचे शौर्य व त्याग या बाबी प्रत्येकाने आत्मसात कराव्यात, असेही त्यांनी सांगितले.

आव्हाड यांच्या संकल्पनेतून सैनिकांसाठी राखी पाठविण्याचा हा उपक्रम गेल्या १६ वर्षांपासून सुरू आहे. यंदा विद्यालयातील इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थिनींनी रक्षाबंधनाचे औचित्य साधून सीमेवर कर्तव्य बजावणाऱ्या सैनिकांसाठी १९० भेटकार्डच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थिनींनी स्वतः च्या हाताने तब्बल १ हजार ५५ राख्या तयार केल्या.

भेटकार्डमध्ये विद्यार्थिनींनी काव्यात्मकस्वरूपात देशभक्तीच्या भावना व्यक्त करत सैनिकांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, बंधुभाव, एकात्मता आणि कृतज्ञतेची भावना रुजविण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक शरद मेढे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन ज्ञानेश्वर गायके, रेश्मा सातपुते व अर्चना दराडे यांनी केले. यावेळी संपत घारे, सोनिका वखरे, स्नेहल बोराडे, मीना तडके, खेडकर गीतांजली, कल्याणी मरळीकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# रुग्णसेवेसाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल विश्वास व श्रद्धेचे केंद्र : सीए अशोक पितळे

## आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरात १३५ रुग्णांची तपासणी

**● अहिल्यानगर | वीरभूमी–**

रुग्णसेवेसाठी विश्वास व श्रद्धेचे केंद्र म्हणून आनंदऋषीजी हॉस्पिटलने नावलौकिक मिळवला आहे. प.पू. आनंदऋषीजी महाराजांच्या मानवसेवेच्या कार्याची पायाभरणी प.पू. आदर्शऋषीजी यांनी या हॉस्पिटलच्या उभारणीतून केली. जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य समर्पित भावनेने या कार्यात योगदान देत आहेत. रुग्णसेवेचे रोपटे आता वटवृक्षात बहरले असून, अनेक गरजू कुटुंबांना या सेवेच्या सावलीचा आधार मिळाला आहे, अशी भावना सीए अशोक पितळे यांनी व्यक्त केली.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल ण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी महाराज यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त सीए अशोक धनराज पितळे परिवाराच्या वतीने मोफत अस्थिरोग तपासणी, मणके व सांधेबदली शस्त्रक्रिया तसेच फिजिओथेरपी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सीए अशोक पितळे बोलत होते. यावेळी सौ. निता पितळे, मनीष पितळे, सीए गौरव पितळे, आनंद पितळे, संतोष बोथरा, डॉ. वसंत कटारिया, सतीश लोढा, माणकचंद कटारिया, वसंत चोपडा, तज्ज्ञ डॉ. विशाल शिंदे, डॉ. रोहन धोत्रे, स्पाइन सर्जन डॉ. अमित सुराणा, डॉ. श्रीकांत दलाल, डॉ. भरत जगताप, डॉ. नितीन कुमार, डॉ. अभय साठे, डॉ. आराधना अखडे आदी उपस्थित होते.



पुढे सीए पितळे म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवाकार्यात उद्योग–व्यवसाय सांभाळून अनेक कुटुंबे समर्पित भावनेने रुग्णसेवेशी जोडली गेली आहेत. त्यांची पुढील पिढीदेखील या कार्यात योगदान देत आहे. गरिबांना कमी खर्चात उपचार मिळावेत, हा रुग्णसेवेचा मापदंड घेऊन हॉस्पिटलमध्ये कार्य केले जात आहे. हॉस्पिटलच्या नेत्रालयाने राज्यात सर्वाधिक यशस्वी शस्त्रक्रिया करण्याचा मान मिळवला आहे. उपनगरातील नागरिकांसाठी तारकपूर येथेही सेंटर सुरू करण्यात आले असून, त्याचा लाभ सर्वसामान्यांना मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविका संतोष बोथरा यांनी केले. डॉ. विशाल शिंदे यांनी गुडघा प्रत्यारोपण व खुबा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेची माहिती दिली. गुणवत्तापूर्ण इम्प्लांटसह अल्पदरात शस्त्रक्रिया केल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. गोठलेला खांदा, मानदुखी व पाठदुखी याबाबतही उपचारांची माहिती त्यांनी दिली.

या मोफत शिबिरात एकूण १३५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांनी अस्थिरोग, मणके व सांधेदुखीबाबत रुग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले. शिबिरामुळे गरजू रुग्णांना तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला तसेच पुढील उपचारांबाबत मार्गदर्शन देण्यात आले.